ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ९ मे, १९५६ | अंक १९

## विविध माहिती

**वीजकेंद्राचें उद्घाटन**—उत्तर प्रदेशांतील सर्वांत मोठ्या विद्युत् केंद्राचें उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री श्री. संपूर्णानंद ह्यांनीं केलें. राज्याच्या विकासयोजनांत ह्या केंद्राला बरेंच महत्त्वाचें स्थान आहे. केंद्रांत निर्माण होणाऱ्या विजेच्या योगानें १२ जिल्ह्यांतील गांवांना प्रकाशाचा लाभ तर होईलच; पण खेड्यांतील उद्योगधंद्यांना जरूर असणारी शक्तीहि मिळूं शकेल.

**अन्नधान्याच्या वाढत्या किंमती**—मध्य प्रदेशांत अन्नधान्याच्या किंमती भडकूं लागल्या आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारनें ३,००० टन ज्वारी आणि ५,५०० टन तांदूळ बाजारांत विक्रीसाठी पाठविले आहेत. मध्यवर्ती सरकारकडून आणखी २०,००० टन धान्य मिळणार असून तें हातीं आल्यावर धान्याच्या किंमती गरीब वर्गाच्या आवाक्यांत राहतील असा अंदाज आहे.

**बिहारमधील क्षयरोगी**—बिहारमध्यें क्षयरोग्यांचें प्रमाण वाढत चालल्यामुळें सार्वजनिक आरोग्याधिकाऱ्यांचें त्याकडे विशेष लक्ष वेधलें आहे. क्षयरोग्यांची नक्की संख्या सांगतां येण्यासारखी नसली तरी ती ३ लाखांच्या घरांत असावी, असा अंदाज करण्यांत आला आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च ही संस्था ह्या बाबतींत नमुन्याची पहाणी करीत आहे.

**मच्छीमारीच्या धंद्याचें शिक्षण**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी खात्यातर्फे श्री. लूसी नांवाचे मच्छीमारी विषयक तज्ज्ञ भारतांत आले आहेत. कोचीन येथें मच्छीमारीच्या धंद्याचें शिक्षण देण्याचें एक केंद्र काढण्यांत येणार आहे. त्याचें मार्गदर्शन करण्यासाठी ते आले आहेत केंद्र १ जूनपासून सुरू होईल. प्रथम २५ तरुणांना खोल समुद्रांतील मच्छीमारीचें शिक्षण देण्यांत येईल.

**नागपूर-भोपाळ हवाई-मार्ग**—इंडिअन एअरलाईन्स कॉर्पोरेशन नागपूर ते भोपाळ ह्या मार्गावर विमान-वाहतूक सुरू करण्याचा विचार करीत आहे. नव्यानें बनणाऱ्या मध्यप्रदेशांतील जबलपूर-इंदूर सारखीं मोठीं शहरेंहि अशींच जोडलीं जाण्याचा संभव आहे. ह्या नवीन मार्गावर नुकतीच खरेदी करण्यांत आलेली 'हेरॉन' विमानें वापरलीं जातील असें दिसतें.

**भिक्षा मागणें आम्हीं सोडूं, पण**—इंदूरमधील भिक्षेकऱ्यांनीं आपली एक परिषद् नुकतीच भरविली होती. मध्यभारत सरकारनें नोकऱ्यांची सोय केल्यास आणि भूमिहीनांना जमिनी दिल्यास भिक्षावृत्ति सोडण्याची तयारी त्यांनीं दाखविली. राज्यांतील भिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीनें ज्या शिफारसी केल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करण्याची विनंतीहि सरकारला करण्यांत आली.

**लोकसंख्येच्या बाबतींत दुसरा अनुक्रम**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेनें आपलें लोकसंख्याविषयक वार्षिक प्रसिद्ध केलें आहे. १९५०–५४ ह्या कालांत भारताची लोकसंख्या ३७·७ कोटी झाली असें त्यांत नमूद करण्यांत आलें आहे. लोकसंख्येच्या बाबतींत भारताचा दुसरा अनुक्रम लागतो. सर्व राष्ट्रांत चीनची लोकसंख्या सगळ्यांत जास्त म्हणजे ५८·२ कोटी आहे. १९५४ अखेर पुऱ्या झालेल्या पांच वर्षांत जगाची लोकसंख्या पूर्वीपेक्षा अधिक झपाट्यानें वाढली.

**श्री. मिकोयन ह्यांचा दौरा**—सोव्हिएट रशिआचे उपपंतप्रधान श्री. मिकोयन हे लवकरच दक्षिण अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत अशी वार्ता आहे. परराष्ट्रीय व्यापारांत ते तज्ज्ञ समजले जातात. दक्षिण अमेरिकेंतील देशांशीं अधिक व्यापार करण्याची व त्यांना आर्थिक मदत देण्याची तयारी रशिआनें दाखविली होती. अर्जेंटायना, ब्राझिल, चिली व युराग्वे ह्या देशांना ते भेटी देतील.

**उटकमंडजवळ कागदाची गिरणी**—मद्रास सरकारनें उटकमंडजवळ कागदाची गिरणी काढण्याचें ठरविलें आहे. गिरणीसाठी लागणारा लगदा तयार करण्यासाठी जरूर त्या झाडांची लागवड करण्यासंबंधी पाहणी सुरू करण्यांत आली आहे. सुमारें ६,००० एकर जमिनीवर झाडें लावण्यांत येतील. भवानी-सागर अगर मेटुप्पलायम् ह्या दोन ठिकाणांपैकी एका ठिकाणीं गिरणीची जागा मुक्रर करण्यांत येईल.

**पायतणांचा सहकारी कारखाना**—निझामाबाद येथें पायतणें तयार करण्याचा सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा कारखाना स्थापन करण्यांत आला आहे. हैद्राबाद सरकारच्या समाज-सेवा खात्यानें गांवांतील चांभारांना कारखाना चालू करण्यासाठी २,००० रुपयांची मदत दिली. भांडवलाच्या अभावीं ह्या गरीब चांभार कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळत नव्हता. आतां त्यांना चांगली संधि देण्यांत आली आहे.

**दांतांच्या आरोग्यासाठी चहा**—दातांचें आरोग्य टिकविण्यासाठी थोड्या प्रमाणांत वयाच्या पहिल्या वर्षापासून चहा द्यावा, असें मत एका अमेरिकन शास्त्रज्ञानें व्यक्त केलें आहे. मात्र चहा चिनी लोक जसा घेतात तसा घेण्यांत आला पाहिजे. चिनी लोक चहांत साखर न घालतां घेतात. मुलांना दूधहि भरपूर द्यावयास हवें, असें त्यांनीं मुद्दाम सांगितलें आहे. साखरच दातांच्या आरोग्याला घातक असते, असें प्रयोगांतीं दिसून आलें आहे.

**टेलिव्हिजनची स्थापना**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतांत टेलिव्हिजनची सुरवात करण्यांत येणार आहे. ह्या बाबतींत जो कार्यक्रम तयार करण्यांत आला आहे त्यासाठीं ४० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. देशांतील रेडिओचा विस्तार करण्यासाठीं एकूण ९ कोटी रुपये खर्च करण्यांत येतील. ह्या रकमेंतच वरील ४० लाख रुपयांचा समावेश करण्यांत आला आहे.

**रशियाजवळील सोनें**—लंडनमधील एका जगप्रसिद्ध व्यापारी कंपनीनें केलेल्या अंदाजाप्रमाणें रशिआजवळ २० कोटी औंस सोन्याचा सांठा आहे. रशिआंत दरसाल १ कोटी औंस सोन्याचें उत्पादन होत असावें. इतक्या उत्पादनाची किंमत १२·५ कोटी पौंड होतें. रशिआजवळील सोन्याच्या सांठ्याची किंमत सुमारें २५० कोटी पौंड होईल. उत्पादनाच्या बाबतींत रशिआचा अनुक्रम दक्षिण आफ्रिकेच्या खालोखाल लागतो.

**रेल्वेच्या सामानाची खरेदी**—१९५६–५७ सालांतील गरजेसाठीं भारतीय रेल्वेनें परदेशांत बरेंच साहित्य खरेदी करण्याचें ठरविलें आहे. सर्व साहित्याची किंमत सुमारें २० कोटी रुपये होईल. जो माल भारतांत तयार होऊं शकत नाहीं अशाच मालाची खरेदी करण्यांत येणार आहे. कलकत्ता शहर व उपनगरें ह्यांच्या दरम्यान वहातूक करण्यासाठीं २०३ विजेच्या गाड्यांचे डबे व ५५ विजेचीं एंजिनें आयात करण्यांत येतील.

**कलकत्त्याजवळ प्राचीन अवशेष**—कलकत्त्याच्या ईशान्येस २३ मैलांवर एका प्राचीन शहराचे अवशेष आढळून आले आहेत. बंगालच्या मौर्यकालीन इतिहासावर ह्या शोधामुळें नवा प्रकाश पडण्याची शक्यता आहे. ह्या शहराचें प्राचीन नांव चंद्रकेतुगड असें आहे. त्याची रचना चौरस आहे आणि त्याच्याभोंवतीं तटबंदी आहे. उत्खननाचें कार्य कलकत्ता विद्यापीठातर्फे करण्यांत आलें.

**तिसऱ्या वर्गांतील झोंपण्याची सोय**—हल्लीं रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून झोंपण्यासाठीं राखून ठेवण्यांत येणाऱ्या एका जागेसाठीं दररात्रीला ३ रुपये जादा आकार घेण्यांत येतो. लोकसभेच्या एस्टिमेटस् कमिटीनें हा आकार २ किंवा २॥ रुपये ठेवण्यांत यावा अशी शिफारस केली आहे. झोंपण्याची सोय सर्व जनता एक्सप्रेस गाड्यांत ठेवण्यांत यावी व हळुहळु ती सर्वच गाड्यांत करावी, अशीहि सूचना करण्यांत आली आहे.

**माळ्याच्या व्यवसायाचें शिक्षण**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत माळ्यांना त्यांच्या कामाचें शिक्षण देणारीं केंद्रें काढण्याचें मध्यप्रदेश सरकारनें ठरविलें आहे. केंद्रें पंचमढी आणि नागपूर ह्या ठिकाणीं काढण्यांत येतील. खाजगी व सार्वजनिक उद्यानांसाठीं लागणारे माळी केंद्रांतून तयार करण्यांत येतील. अभ्यासक्रम एक वर्षाचा आहे. दरवर्षी १८ माळी शिकून तयार होतील. त्यांना दरमहा ३० रुपये देण्यांत येतील.

**गुन्हेगारांना सुधारण्यासाठीं**—सोलापूरच्या तुरुंगांतील गुन्हेगारांना मुंबई सरकारच्या प्रसिद्धीखात्यातर्फे कांहीं निवडक चित्रपट दाखविण्यांत येणार आहेत. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत झालेली प्रगति व दुसऱ्या कार्यक्रमाची रूपरेखा ह्यासंबंधीचे कांहीं अनुबोधपट दाखविण्यांत येतील. त्याशिवाय गुन्हेगारी प्रवृत्ति सोडून उपयुक्त काम करण्यास प्रोत्साहन देतील असेहि चित्रपट दाखविण्यांत येतील.

## आर्थिक समस्यावर विकेंद्रीकरणाचा उपाय

भारतीय सरकारचे मजूरमंत्री श्री. खंडुभाई देसाई ह्यांनीं अहमदाबाद येथील लास्की इन्स्टिटयूट ऑफ पोलिटिकल सायन्स ह्या संस्थेपुढें राजकीय व आर्थिक विषयासंबंधीं आपले विचार व्याख्यानाच्याद्वारें प्रकट केले. ते म्हणाले कीं, विकेंद्रीकरणाचा उपाय फक्त आर्थिक क्षेत्रांतच न करतां राजकीय क्षेत्रांतहि त्याचा अवलंब करण्यांत आला पाहिजे. भारतापुढें असलेले आर्थिक प्रश्न कायमचे व सत्यार्थानें सोडवावयाचे असतील तर विकेंद्रीकरणाचीच कास धरली पाहिजे. ह्या उपायाची योजना करण्यांत आली तर देशांत सर्वोदयी समाजाचा मार्ग सोपा होईल. रशिआंत अलीकडेच ज्या घडामोडी झाल्या आहेत त्यांचा मूलगामी विचार केला तर असें दिसून येईल कीं, त्याही देशांत विकेंद्रीकरणाची प्रवृत्तीच वाढीस लागलेली आहे. सोव्हिअट रशिआंत राजकीय सत्तेचें एकीकरण अगदीं पराकोटीला पोंचलें होतें. त्या बिंदूपासून स्थानिक जनतेला राज्य–कारभाराशीं जोडून घेण्याकडे कल दिसून येत आहे. ही उत्क्रांति अर्थगर्भ आहे. पण उत्क्रांतीची ही दिशा अमेरिकेच्या धोरणामुळें रशिआला स्वीकारावी लागली असा त्याचा अर्थ नव्हे किंवा रशिअन राज्यकर्त्यांच्या अंतर्गत धोरणाचा तो अनिर्वाह्य परिपाक आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. एका दृष्टीनें मात्र ही उत्क्रांति अनिर्वाह्य होती असें म्हणतां येईल. रशिअन लोकांचीच अशी इच्छा होती कीं अधिक दक्ष आणि लोकमताला अधिक जबाबदार असणारें सरकार अधिकारसंपन्न व्हावें. त्यांच्या ह्या इच्छेंतच गेल्या कांहीं वर्षांतील घडामोडींचे अंकुर असले पाहिजेत. १९ व्या शतकांत जगांत मुख्यतः साम्राज्यवादच मातबर झाला. मार्क्सवादहि साम्राज्यवादाचीच प्रतिक्रिया होती असें एका अर्थानें म्हणतां येईल. शुद्ध भांडवलशाही व कम्युनिझम ह्या दोन्ही विचारपद्धति लवकरच एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या. कारण, कम्युनिझमनें आपली सर्व मदार प्रधानतः भौतिक वादावरच ठेवली. आर्थिक विकेंद्रीकरणाबरोबरच राजकीय सत्तेचेंहि विकेंद्रीकरण करण्याची श्री. खंडुभाई ह्यांची कल्पना नवी नसली तरी भारतीय संदर्भांत विचारणीय वाटते.

## हॉटेल धंद्याच्या शिक्षणासाठीं भारतीय विद्यार्थ्यांची तुकडी

हॉटेलविषयक शिक्षण घेण्यासाठीं भारतीय विद्यार्थ्यांची एक तुकडी परदेशांत पाठविण्याचा भारत सरकार विचार करीत आहे. कोणत्या देशांत पाठवावें त्यासंबंधीं अद्यापि निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. ह्या योजनेनुसार यंदा तिघांना पाठविण्यांत येणार आहे. पदवीधर असलेले व १८ ते २१ वर्षे वयाचे तरुण निवडीस पात्र आहेत. शिक्षणाचा कालावधि तीन वर्षांचा आहे. यासाठीं जाण्यायेण्याचा, शिक्षणाचा व राहण्याजेवण्याचा खर्च भागण्याइतकी शिष्यवृत्ति देण्यांत येणार असून त्या रकमेपैकीं ४० टक्के भारत सरकार देईल व बाकीचा ६० टक्के खर्च हॉटेल ॲण्ड रेस्टॉरॉ असोसिएशन ऑफ इंडियाचें फेडरेशन आणि संबंधित विद्यार्थी करतील. विद्यार्थ्यानें करावयाच्या खर्चाचें प्रमाण निश्चित करण्यांत आलेलें नाहीं.

**भावनगर येथें सायकलींचा कारखाना**—मुंबईमधील एक बडा कारखानदार भावनगर येथें सायकलींचा कारखाना काढण्याच्या विचारांत आहे. कारखाना बराच मोठा असेल असें समजतें. कारखान्याच्या उभारणीसाठीं सुमार १२५ लाख रुपये भांडवल लागेल आणि तो चालू झाल्यावर निदान १,००० मजुरांना तरी रोजगार मिळूं शकेल.

# अर्थ

बुधवार, ता. ९ मे, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ठेवींवर बँकांनीं व्याज किती द्यावें ?

ठेवी आकर्षणासाठी आतां बँकांत स्पर्धा सुरू झाली आहे आणि त्यामुळें ठेवींवरील व्याजाचे दर वाढविण्यांत येऊं लागले आहेत. ठेव ठेऊं शकणाऱ्यांना बँकेंत पैसे ठेवण्यास उद्युक्त करण्याचा हा प्रयत्न आहे. व्याजाचा दर ठेवीदाराला आकर्षक वाटावा पण बँकेला तो परवडावा, असाच असावयास हवा; आणि त्या दृष्टीनें चालकांनीं छाननी करणें जरूरीचें असतें. ठेवीदारांना ठेवींची सुरक्षिततताहि हवी असते; तेव्हां ज्या बँकांची स्वतःच्या भक्कमपणाबद्दल पूर्ण खात्री आहे, अशांनीं त्याची जाहिरात करण्यास हरकत नाहीं.

ठेवीदाराला व्याजाचा दरहि चांगला हवा असतो; पण तो प्रत्यक्ष किती ठरविण्यांत यावा, ह्याचा निर्णय करतांना बँकेनें स्वतःकडील ठेवींच्या रकमेपेक्षा नफ्याची रक्कम आधीं विचारांत घ्यावी. बँकेच्या किफायतशीरपणापेक्षा तिच्या आकारास ज्यास्त महत्त्व देण्याची साधारण प्रवृत्ति दिसून येते. भारतांतील पांच मोठ्या बँकांचीं नांवें सहज सांगतां येतील, पण सर्वांत किफायतशीर बँका कोणत्या हें किती जणांना माहीत असेल ? कोणत्या बँकांना सर्वांत जास्त प्रमाणांत नफा मिळतो, हें किती जणांना ठाऊक असेल ?

बँक चालवितांना किफायतशीरपणास प्राधान्य दिलें गेलें पाहिजे. बँकेला नफा होणें हें सार्वजनिक हिताशीं विसंगत नाहीं. कोणताहि महत्त्वाचा निर्णय घेतांना बँकरनें दूरदर्शीपणानें नफ्याचाच प्रथम विचार केला पाहिजे. कारण, बँकेला चांगला नफा होत राहिला, तरच तिचे हातून व्यापक दृष्टीच्या उपकारक गोष्टी होऊं शकणार. हें सत्य असलें तरी पुष्कळ वेळां ठेवींच्या आंकड्यांसच जास्त महत्त्व दिलें जातें. अर्थात्, ठेवींवर नफा अवलंबून रहातो, हें खरें आहे. ठेवी नसतील, तर नफा उरणारच नाहीं. पण ठेवींत वाढ झाली तर नफा घटूंहि शकेल; ठेवी घेण्यासाठीं किती व्याज दिलें जातें व खर्च केला जातो, ह्यावर तें अवलंबून राहील.

लोकांची बचत आकर्षून घ्यावयाची, तर ठेवींवर भरपूर व्याज दिलेंच पाहिजे. पण दिलेलें व्याज व बँकेला मिळणारें व्याज ह्यांत प्रमाणबद्धता हवी. ह्यादृष्टीनें खालील तीन मुद्दे महत्त्वाचे आहेत:—

( १ ) चालू व्याजाचा दर कायम ठेवला, तर किती ठेवी कमी होतील ?

( २ ) सध्यां असलेल्या ठेवी कायम ठेवण्यासाठी किती व्याज दिलें पाहिजे ?

( ३ ) ठेवींत विशिष्ट वाढ घडवून आणण्यासाठी व्याजाचा दर किती वाढवावा लागेल ?

त्याचप्रमाणें, खालील हिशेबहि करावे लागतील:—

( १ ) सध्याच्या कर्जावर बँकेला किती उत्पन्न मिळतें ?

( २ ) कांहीं ठेवी कमी झाल्या, तर उत्पन्न किती कमी होईल?

( ३ ) ठेवींत विशिष्ट वाढ झाली, तर उत्पन्न किती वाढेल ?

हा हिशेब करणें अर्थात् सोपें नाहीं; पण तो जितक्या काळजीपूर्वक केला जाईल, तितका व्याजाच्या दराबद्दलचा निर्णय योग्य ठरेल.

इतर बँका किती व्याज देतात, हा मुद्दा महत्त्वाचा असला, तरी तो निर्णायक ठरू नये. तो व्याजाचा दर परवडला नाहीं, तरी दिलाच पाहिजे, असें मानण्यांत येतें. परंतु प्रत्येक बँकेची परिस्थिति वेगवेगळी असते. सर्व्हिस चार्जेस, अधिकाऱ्यांचा पगार, इमारतींवरील खर्च, गुंतवणूक, ह्या प्रत्येक बाबतींत बँका-बँकांत फरक आढळतो. प्रत्येक बँकेकडील ठेवींचे प्रकार आणि कर्जातील गुंतवणुकीचे प्रकार, ह्यावर व्याजाचा दर अवलंबून राहील. एका बँकेला ठेवींचें जेवढें महत्त्व असेल, तितकेंच दुसऱ्या बँकेला असेलच, असें नाहीं. म्हणून, व्याजाच्या दरांतहि समानता रहात नाहीं. किफायतशीरपणा, ह्याच कसावर शेवटीं व्याजाचा दर अवलंबून ठेवावा लागतो; हा किफायतशीरपणाहि दीर्घकालीन असावा लागतो; तात्कालिक नफ्याचा विचार इष्ट ठरत नाहीं. एका अमेरिकन बँकरनें "बचत करणाऱ्यांचा पिच्छा पुरवितांना बँकेनें कोणती दक्षता घेतली पाहिजे" ह्याचें एका भाषणांत ह्याप्रमाणें उत्कृष्ट विवेचन केलें, तें हिंदी बँकिंगच्या सद्यःस्थितीस पूर्णपणें लागूं पडत आहे.

## वाङ्मयाच्या पुरस्कारासाठी ट्रस्ट

भारतीय सरकारनें एक नॅशनल बुक ट्रस्ट स्थापन करण्याचें ठरविलें आहे. चांगल्या वाङ्मयाच्या निर्मितीला उत्तेजन देणें व अशाप्रकारचें वाङ्मय वाचनालयांना, शैक्षणिक संस्थांना आणि लोकांना वाजवी किंमतींत देणें ह्या हेतूनें प्रेरित होऊन ट्रस्टचा उपक्रम हातीं घेण्यांत आला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत ट्रस्टला आपलें कार्य करतां यावें म्हणून ३० लाख रुपयांची रक्कमहि मंजूर करण्यांत आलेली आहे, असें समजतें. भारताचें अभिजात वाङ्मय प्रसिद्ध करणें, परकीय भाषांतील सुप्रसिद्ध पुस्तकांचीं भाषांतरें करणें, आणि भारतीय भाषांतील सर्वमान्य पुस्तकांचीं उभयविध भाषांतरें करणें हीं कामें ट्रस्ट मुख्यतः करणार आहे. त्याशिवाय भारतीय चित्र, शिल्प ह्यांच्या प्रतिकृति आणि इतर कलात्मक वस्तूंच्या प्रतिकृति तयार करण्याचें कामहि ट्रस्ट करणार आहे. भारतीय ग्रंथकारांच्या मान्यता प्राप्त झालेल्या पुस्तकांच्या प्रकाशनालाहि ट्रस्ट मदत करणार आहे. शैक्षणिक शास्त्रीय, आणि कलात्मक विषयांवरील सर्वमान्य पुस्तकांच्या प्रसिद्धीकडे ट्रस्ट लक्ष पुरविणार आहे. भारतीय राज्यघटनेंत ज्या भाषा नमूद करण्यांत आल्या आहेत त्या सर्व भाषांतून व हिंदी भाषांतून पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत. त्याशिवाय परदेशीय भाषांतूनहि प्रकाशन करण्यांत येणार आहे. नॅशनल बुक ट्रस्ट ही संस्था सरकारनें स्थापलेली

असली तरी तिचें कार्य स्वतंत्रपणें चालणार आहे असें [illegible]तें. संघटनेच्या कार्यासाठीं सरकारच पैशाची तरतूद करणार आहे. भारतामधील पुस्तक प्रकाशनाचा व्यवसाय खाजगी स्वरूपाचा आहे. त्यामुळें इतर व्यवसायांप्रमाणें ह्याहि व्यवसायाला व्यापारी पद्धतीनेंच आपला संसार चालवावा लागतो. प्रकाशनाचा धंदा व्यापारी पद्धतीनें चालवावयाचा असें एकदां ठरल्यावर त्यावर साहजिकच कांहीं मर्यादा पडतात. त्या मर्यादांचें उल्लंघन करून उत्कृष्ट वाङ्मयाच्या निर्मितीला उत्तेजन देणें पुष्कळदां अशक्य होतें. त्यादृष्टीनें भारतीय सरकारचा हा उपक्रम स्वागतार्ह आहे.

## आसाममधील साखरेचा पहिला कारखाना

आसामच्या सरकारनें राज्यांत साखरेचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. राज्यांतील हा पहिलाच साखर कारखाना असून ऊंस गाळण्याच्या कामास १९५७–५८ सालच्या हंगामापासून प्रारंभ होईल असा अंदाज आहे. सहकारी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याच्या भारतीय सरकारच्या धोरणास अनुसरून हा कारखाना-हि सहकारी तत्त्वावरच चालविण्याचें ठरलें आहे. आसामला सध्या आपली साखरेची सर्व गरज इतर राज्यांतून साखर आणवून भागवावी लागते. नवीन कारखाना सुरू झाल्यावर राज्य[illegible] साखरेची जवळजवळ सर्व गरज तो भागवूं शकेल. ह्या सर्व [illegible]ला एकूण ९० लाख रुपये लागतील. वरील रकमेंत कारखान्यासाठीं लागणाऱ्या उसाच्या लागवडीवर होणारा खर्च समाविष्ट केलेला नाहीं. कारखान्यासाठीं लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचा करार नुकताच करण्यांत आला आहे. आसाम को-ऑपरेटिव्ह शुगर मिल्स आणि स्कोडा ( इंडिआ ) ह्यांच्यामध्यें हा करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें स्कोडा कंपनी १,००० टन ऊंस गाळणारी यंत्रसामुग्री पुरविणार आहे. कारखान्याची उभारणी करण्याचें कामहि कंपनीनेंच आपल्या अंगावर घेतलेलें आहे. कलकत्त्यामधील झेकोस्लोव्हाकिआचे ट्रेड कमिशनर आणि स्कोडा कंपनीचे एक डायरेक्टर ह्यांनीं ह्या कामीं बरेंच सहकार्य दिलें. कंपनीचे यंत्रविषयक तज्ज्ञ आणि इतर अधिकारी आसाम सरकारशीं वाटाघाटी करण्यासाठी भारतांत आले होते. आसाम सरकार आणि कंपनीचे प्रतिनिधी ह्यांच्या दरम्यान गेले कित्येक दिवस वाटाघाटी चालल्या होत्या. अखेर त्या फलप्रद झाल्या आणि साखर कारखाना उभारण्याचा करार करण्यांत आला. साखरेच्या धंद्यांतील यांत्रिक बाजूचें शिक्षण देऊन वाकबगार माणसें तयार करण्याची तरतूद करारांत करण्यांत आली आहे. हें शिक्षण देण्यासाठी झेकोस्लोव्हाकिआंतून कांहीं तज्ज्ञ मुद्दाम भारतांत येणार आहेत. •

**१९४४–४५, १९४७–४८ व १९५४–५५ या वर्षांच्या अखेरीस भारतांत नोंद झालेल्या कंपन्यांची औद्योगिकदृष्ट्या वर्गवारी दाखविणारें पत्रक )**

( भांडवलाचे आंकडे कोटी रुपयांत )

| औद्योगिक समूह | १९४४–४५ | | १९४७–४८ | | १९५४–५५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कं. संख्या | वसूल भांडवल | कं. संख्या | वसूल भांडवल | कं. संख्या | वसूल भांडवल |
| बँका व कर्ज देणाऱ्या संस्था | २०३० | ४१·९ | १७७६ | ६०·० | १९०८ | ७४·८ |
| विमा कंपन्या | ४०४ | ८·६ | ३५७ | १०·५ | ३३२ | १२·० |
| कापड गिरण्या | ४३२ | ४८·३ | ५९१ | ६२·९ | ६५२ | १,१५·० |
| तागाच्या गिरण्या | ९० | २१·४ | १०० | २३·० | १०८ | ३०·९ |
| लोकरीच्या, रेशमाच्या वगैरे गिरण्या | ७७ | ३·७ | १२२ | ६·४ | १६८ | १२·१ |
| कागद गिरण्या | ३७ | ३·४ | ६५ | ६·४ | ६४ | ११·७ |
| भाताच्या व पिठाच्या गिरण्या | १२३ | २·३ | १५७ | २·९ | २२१ | ४·७ |
| चहा | ४७३ | १५·१ | ५१८ | १७·७ | ५६७ | २६·९ |
| कॉफी | २१ | ·५ | २८ | ·९ | २७ | १·३ |
| कोळसा | २६६ | ९·२ | ३८४ | १५·१ | ४८१ | २२·६ |
| मादक पेयें | २९ | १·० | ३८ | १·६ | ४२ | १·९ |
| साखर | १६५ | १४·४ | १८२ | १९·३ | २१३ | २९·६ |
| मुद्रण, प्रकाशन व स्टेशनरी | ६२३ | ४·१ | १२३० | ६·९ | १७४७ | १४·० |
| रसायनें व अनुषंगिक धंदे | ७५४ | १०·३ | १३०० | २०·३ | १६९७ | ४९·७ |
| लोखंड, पोलाद व जहाजबांधणी | २७० | ११·८ | ४२५ | १८·८ | ७३४ | ४४·५ |
| इंजिनियरिंग | ४०८ | ७·७ | ७९७ | १४·८ | ११७१ | २७·७ |
| पब्लिक सर्व्हिस कंपनीज | ३४६ | २७·५ | ३५४ | २८·२ | ४१० | ४९·७ |
| चिकण माती, दगड, सिमेंट इ. | ५४ | ११·६ | २५२ | १७·६ | ३५४ | ३१·८ |
| तंबाखू ( सिगरेट इ. ) | ४५ | ५·४ | ७६ | ७·४ | ९१ | १९·३ |
| साबण, मेणबत्त्या इ. | ४४ | १·३ | ८० | २·० | १०५ | ३·६ |
| आगपेट्या | ३६ | १·१ | ५१ | २·१ | ५६ | ३·५ |
| तेल गिरण्या | ९५ | १·६ | ३२८ | ६·४ | ३६३ | ११·८ |
| रबर | ७० | २·७ | ६७ | ४·१ | ६७ | ४·१ |
| मॅंगॅनिज | ३ | ·०४ | ३ | १·०१ | १४ | ·२ |
| पेट्रोल | ६ | ·४ | ८ | ·४ | २२ | २·८ |
| मालमत्ता, जमिनी व इमारती | ३६९ | १५·५ | ६६६ | ३०·२ | ९४९ | २९·३ |
| उपाहारगृहें, प्रेक्षागृहें, इ. | ५१८ | ३·६ | ११४७ | ८·२ | १३७८ | १२·९ |

## विवाह-विच्छेदाचा प्रतिगामी कायदा

( लेखकः—श्री. स. वा. दातार, वकील. )

१८ मे, १९५५ पासून हिंदुस्थान सरकारचा १९५५ चा " हिंदु विवाह कायदा " अखिल भारतांत जारी करण्यांत आला. ह्या कायद्यामध्यें हिंदूंच्या रूढ संस्कारयुक्त विवाहासंबंधीचे व तशा विवाहापासून काडीमोड मिळण्याचे निर्बंध ग्रथित करण्यांत आले आहेत. तत्पूर्वी मुंबई राज्यांत १९४७ च्या " मुंबई राज्य हिंदू घटस्फोट कायद्याखाली " काडीमोड मिळण्याची सोय केली होती.

हिंदुस्थान सरकारच्या ह्या " हिंदु विवाह कायद्यानें " मुंबई राज्यांतील हिंदु प्रजाजनांची सोयीपेक्षा गैरसोयच अधिक होऊन बसली आहे. मुंबई राज्यांतील प्रजाजनांच्या दृष्टीनें हा कायदा अत्यंत प्रतिगामी स्वरूपाचा व अडवणूक करणारा आहे.

मुंबई राज्यांत १९४७ च्या " हिंदू घटस्फोट कायद्या " खाली चार वर्षांचा परित्याग असेल तर काडीमोड मिळण्याची सोय होती; व ती काडीमोड न्यायालयांत एकच ' काम ' चालवून मिळूं शकत होती. नव्या कायद्यानें हा परित्यागाचा काळ दोन भागांत विभागला आहे व त्यांतील प्रत्येक विभागाचे अंतीं एकेक दावा लावणें सक्तीचें करून ठेवलें आहे. सर्वांत विशेष अडचणीची गोष्ट अशी कीं, १८ मे १९५५ पावेतों परित्यागाचा चार वर्षांचा काळ पुरा झालेला नव्हता म्हणून ज्यांना दावे दाखल करतां येत नव्हते; परंतु १८-५-५५ नंतर लवकरच ज्यांचा सदर परित्यागाचा चार वर्षांचा काळ पुरा झाला त्यांचा कांहींहि विचार ह्या कायद्यानें केलेला नाहीं. ज्या मुंबई हिंदु घटस्फोट कायद्याच्या भरंवशावर त्यांनीं परित्यागाचा काळ चार वर्षांचा भरेपर्यंत कळ काढली, तो कायदाच तीं चार वर्षे पुरीं झाल्यानंतर अस्तित्वांत राहिला नाहीं आणि नवीन कायद्यानें केवळ परित्यागाच्या मुद्यावर एकदम काडीमोड मागण्याची सोयच ठेवलेली नाहीं; अशी ह्या लोकांची विचित्र अवस्था झालेली आहे. दुर्दैवानें असे लोक फार आहेत. पण त्यांची कांहींहि सोय नवीन कायद्यांत केलेली नाहीं. त्यांनाहि बिचाऱ्यांना पूर्वीच्या चार वर्षांच्या दीर्घ परित्यागानंतरहि प्रथम " कायदेशीर फारकत "—" ज्युडिशियल सेपरेशन " साठी कोर्टांत दावा दाखल करावा लागणार असून त्यांत त्यांच्या बाजूचा निकाल झाला कीं मग पुनः दोन वर्षे थांबून नंतर काडीमोडीसाठी आणखी एक दावा लावावा लागणार आहे. पहिल्या फारकतीच्या दाव्यांत सुमारें एक वर्षाचा काळ फुकट जाणार; नंतर दोन वर्षे जावयाचीं व पुढील काडीमोडीच्या दाव्याचा निकाल होण्यास पुनः एक वर्ष खर्ची पडणार ! म्हणजे, ह्या बिचाऱ्यांचे आयुष्यांतील चार मोलाचीं जादा वर्षे फुकट जाणार, असा त्यांच्यावर प्रसंग आहे.

सर्वसाधारणपणेंहि तरुण-तरुणींच्या जवानीच्या काळाचा-सुद्धां फारसा सर्वंकष विचार या नव्या कायद्यानें केलेला दिसत नाहीं. विवाह दुर्दैवानें अयशस्वी ठरलेल्या दंपतीस ह्या कायद्यानें प्रथमतः तीन वर्षे स्वस्थ बसणें भाग आहे. त्यानंतर कोर्टाकडून ' फारकत ' मिळवावयाची; पुनः दोन वर्षे तप करावयाचें व नंतर पुनः कोर्टांत जाऊन काडीमोड घ्यावयाची. काडीमोडीचा हुकूम झाल्यापासून पुनः एक वर्ष दम काढावयाचा; त्या हुकुमावर अपील झालें असलें तर अपिलांतील शेवटच्या हुकुमापासून एक वर्ष संपेपर्यंत दम काढावयाचा व अशा सर्व दिव्यांतून तितिक्षा सुटून पार पडल्यावर नवीन जोडीदाराशीं नव्यानें ' जुगार ' खेळून पहावयाचा ! ह्या साऱ्या विधिविधानांत सुमारें सात-आठ वर्षांचा मोलाचा काळ खर्ची पडणार आहे. ह्याची घ्यावी तशी दखल ह्या कायद्यांत घेतली गेलेली नाहीं, असेंच मोठ्या खेदानें म्हणणें भाग पडत आहे.

पूर्वींचा द्विविवाह प्रतिबंधक कायदा व आतांचा हा काडीमोडीचा कायदा ह्यांनीं असमंजस व असहिष्णु समाजकंटकांच्या हातांत तरुण-तरुणींची अडवणूक करण्याचें मोठेंच शस्त्र देऊन ठेवलें आहे. वास्तविक यंत्रयुगीन सामाजिक प्रगति व अमाप मनुष्यसंख्या ह्यांचा विचार करतां विसंवादी जोडप्यांवर फार काळ परस्पर सहवासाची सक्ति ठेवण्याची आवश्यकता वाटत नाहीं. अयशस्वी विवाहाचीं जळमटें सुमारें दोन-तीन वर्षांत सहज झटकून टाकतां यावीत अशी तरतूद कायद्यानें करावयास पाहिजे होती. निदान, प्रगत मुंबई राज्यांत तरी झालेल्या प्रगतीशीं विसंगत असा हा प्रतिगामी कायदा जारी करावयास नको होता. ह्या कायद्यानें आयुष्याची अडवणूक झालेले अभागी लोक वरचेवर आढळून येतात पण त्यांना कांहींहि मार्गदर्शन वकीलवर्ग करूं शकत नाहीं.

ह्या नव्या कायद्यानें कोर्टांत दोन वेळां जे दावे लावणें भाग झालें आहे त्यांचेसाठी द्यावयाचे कोर्टफीचीहि कांहीं निश्चिति अद्याप झालेली नाहीं. दोन्ही दाव्यांना मिळून पाऊणशें रुपये कोर्ट फी भरण्याचा प्रसंग ह्या कायद्यानें आणून ठेवलेला आहे. व हा गोंधळ अद्याप पुरा संपलेला नाहीं.

वास्तविक हा नवा घटस्फोट कायदा हिंदुस्थान सरकारनें पास केला तेव्हां लगोलग त्यास मुंबई सरकारनें आपल्या राज्यापुरत्या दुरुस्त्या पास करावयास कांहीं हरकत नव्हती. 'क्रिमिनल प्रोसीजर कोड' सारख्या कायद्यांनासुद्धां घटक राज्यांना स्वतः पुरत्या दुरुस्त्या करतां येतात; व केलेल्याहि आहेत. हिंदुस्थानच्या राज्यघटनेनें विवाहाचा विषय मध्यवर्ति सरकार व प्रादेशिक सरकार ह्यांच्या दोघांच्याहि अधिकारक्षेत्रांत समाविष्ट केलेला आहे. म्हणून मुंबई विधिमंडळानें येथील परिस्थित्यनुसार ह्या कायद्यांत जरूर त्या दुरुस्त्या करणें अगत्याचें आहे.

अयशस्वी विवाहाचें जोखड जास्तींत जास्त तीन वर्षांच्या काळांत कोणालाहि झुगारून देतां आलें पाहिजे. फक्त दोन वर्षांनंतर कोणत्याहि कारणावरून काडीमोडीसाठी दावा लावतां यावा. सदरचे दावे अनुभवी ( सिनियर डिव्हिजनच्या ) न्यायाधिशांपुढें चालावेत. त्यांनीं दोन्ही बाजूंच्या वकिलांच्या सहकार्यानें पति-पत्नींत कांहीं समजूत होण्यासारखी आहे काय तें पाहण्याचा प्रयत्न करावा; पण समजूत होण्यासारखी नसेल तर ताबडतोब 'फारकती'चा प्राथमिक हुकुमनामा करावा. त्यानंतर सुमारें सहा महिन्यांचे काळांत पतिपत्नींना समेट करण्याची संधि ठेवावी; व समेट झाला नाहीं तर पक्का निवाडा त्याच कामांत करून कोर्टानें काडीमोड देऊन पक्षकारांना नवा घरोबा करण्यास ताबडतोब मुक्तता द्यावी. हा सारा विधि सुमारें वर्ष-दीड वर्षांत पार पडावा व त्यासाठी जास्तींत जास्त सुमारें पंधरा रुपये कोर्ट फी ठेवली जावी.

ह्या हिंदु विवाह कायद्यांत रूढ संस्कारित विवाहाबाबतचे इतर नियम संकलित करण्यांत आले आहेत; ते बहुतांशीं समाधानकारक आहेत. आक्षेप आहे तो फक्त त्यांतील विवाह विच्छेदासंबंधींच्या तरतुदींबाबत आहे. वरील स्वरूपाच्या सुधारणा ह्या कायद्यांत झाल्यास तो अधिक उपकारक होईल. मुंबई सरकारनें तांतडीनें लक्ष पुरवावें असा हा विषय असून त्याचा त्वरित विचार होईल, अशी प्रबळ आशा आहे.

# भारत सरकारची वार्षिक तूट

पहिल्या पंचवार्षिक योजनेचा मध्यवर्ती सरकारच्या हिशेबांवर झालेला परिणाम मोजणें आतां शक्य झालें आहे. पंचवार्षिक योजनेच्या मुद्दतींत मध्यवर्ती सरकारला एकूण ४५० कोटी रुपयांची तूट आली. १९५१-५२ मध्यें फक्त थोडा वाढावा आढळला, पण त्यानंतर प्रत्येक वर्षी तुटीचा आंकडा वाढतच गेला.

१९५२-५३ व १९५३-५४ मधील तूट भरून काढण्यासाठी शिलकांचा उपयोग मुख्यतः करण्यांत आला, पण मार्च, १९५४ अखेर सरकारची रोख शिल्लक ३७ कोटी रुपये, इतकी खालच्या पातळीला पोंचली, आणि पुढील वर्षी ती ३२ कोटी रुपयांवर उतरली १९५४-५५ नंतर, तूट भरून काढण्यासाठी ट्रेझरी बिलांत वाढ करण्याचा उपाय अवलंबिण्यांत आला; १९५५-५६ मध्यें तर ट्रेझरी बिलांच्या द्वारां रोख शिल्लक वाढविण्याकडेहि त्यांचा कांहीं अंशीं उपयोग करण्यांत आला. कारण, ५० कोटी रुपयांचे खाली शिल्लक जाऊं देणें इष्ट होत नाहीं. ह्या सर्व कारणांमुळें, सरकारच्या फ्लोटिंग कर्जांत वाढ होत गेली आहे.

**मध्यवर्ती सरकारचा वाढावा अथवा तूट**

( कोटी रु. )

| | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | १९५४-५५ | १९५५-५६ दुरुस्त अंदाज | १९५१-५६ एकूण | १९५६-५७ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रोख शिलकांत घट (−) अथवा वाढ (+) | + ०.९ | − ६३.५ | − ६१.३ | − ५.५ | + १८.१ | −१११.३ | + ०.४ |
| फ्लोटिंग कर्जांत वाढ (+) अथवा घट (−) | − ३२.२ | − १७.१ | + १९.५ | +१३६.८ | +२४०.० | +३४७.० | +३५५.८ |
| रोख्यांची विक्री (+) अथवा खरेदी (−) | − २२.२ | − १५.६ | + ६.२* | + ३.१ | + १३.७ | − १४.८ | — |
| एकूण वाढावा (+) किंवा तूट (−) | + ५५.३ | − ३०.८ | − ८७.० | −१४५.४ | −२३५.६ | −४४३.५ | −३५५.४ |


**दि रत्नाकर बँक, लिमिटेड**

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड् ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

## स्टेट को. बँक व सें. फि. एजन्सीज

### शाखा आणि व्यवहार

ज्या जिल्ह्यांतून बाँबे स्टेट बँक मध्यवर्ती बँकेप्रमाणें कर्ज पुरवठ्याचें काम करीत आहे, त्या ठिकाणीं मध्यवर्ती बँकांच्या स्थापनेस प्रोत्साहन देऊन तें काम त्यांचेकडे सोंपविण्याचें बाँबे स्टेट को. बँकेच्या संचालकांचें धोरण आहे. त्याचप्रमाणें, नाशिक जिल्हा बँकेचें २६ जानेवारी १९५५ रोजीं उद्‌घाटन झालें. द. सातारा जिल्ह्यांतील जो विभाग केंद्रीय बँकेकडे होता, तो जिल्हा बँकेकडे देण्यांत आला, आणि द. सातारा बँक आतां सबंद जिल्ह्याची बँक झाली आहे. १९५४–५५ अखेर १४ जिल्हा बँका त्या त्या जिल्ह्यांच्या सबंद क्षेत्रासाठी काम करीत होत्या. त्याचप्रमाणें, जिल्ह्यापेक्षा कांहीं क्षेत्रांतच काम करणाऱ्या ४ जिल्हा बँका, ५ बँकिंग युनियन्स व २ तालुका बँका होत्या. स्टेट को. बँक जिल्ह्यांत प्रत्यक्ष जिल्हा बँकेसारखी मध्यवर्ती बँक म्हणून काम करीत होती आणि ८ जिल्ह्यांच्या कांहीं विभागांत तिची अशीच भूमिका होती. स्टेट को. बँक आणि जिल्हा विभागीय सेंट्रल फिनन्सिंग एजन्सीज ह्यांनीं गेल्या वर्षी एकूण १५ नव्या शाखा उघडल्या. वर्षअखेर त्या सर्वांच्या मिळून २५६ शाखा काम करीत होत्या.


#### शाखांची संख्या

| | १९५५ | १९५४ | १९५३ | १९५२ |
|---|---|---|---|---|
| बाँबे स्टेट को. बँक | ६९ | ६९ | ६७ | ६२ |
| सेंट्रल फिनॅन्सिंग एजन्सीज् | १८७ | १७८ | १६२ | १५७ |
| एकूण | २५६ | २४७ | २२९ | २१९ |

#### स्टेट को. बँक व सें. फि. एजन्सीज यांचे व्यवहार

( आकडे कोटी रुपयांचे )

| | स्टेट को. बँक | सें. फि. एजन्सीज् | एकूण |
|---|---|---|---|
| | १९५५ | १९५५ | १९५५ |
| वसूल शेअर भांडवल | ६१·२४ | १३७·०८ | १९८·३२ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ६१·९४ | १०९·७२ | १७१·६६ |
| ठेवी | १०७९·३८ | १६३०·०६ | २७०९·४४ |
| इतर कर्जें | ८·३२ | ५८·०५ | ६६·३७ |
| एकूण | १२१०·८८ | १९३४·९१ | ३१४५·७९ |
| **कर्ज** | | | |
| **सोसायट्यांना** | | | |
| शेतकी सोसायट्या | २७६·८२ | ५७६·०६ | ८५२·८८ |
| बिगर शेतकी | १३७·६३ | १५४·३० | २९१·९३ |
| **व्यक्तींना** | | | |
| शेतीसाठी | ३·६२ | १८·८८ | २२·५० |
| इतर कामासाठी | २७·९३ | १३०·८७ | १५८·८० |
| एकूण | ४४६·०० | ८८०·११ | १३२६·११ |
| सें. फि. एजन्सीजूसाठी रिझर्व्ह बँकेचें कर्ज | ४९·२७ | — | ४९·२७ |









### भारत सरकारचा संरक्षण खात्यावरील खर्च
( आकडे कोटी रुपयांचे )

| वर्ष | लष्करी खात्यावरील खर्च | एकूण खर्च | लष्करी खर्चाचें एकूण खर्चाशीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| १९५०–५१ | १६८·३२ | ४२४·७३ | ३९·६३ |
| १९५१–५२ | १८१·१३ | ४९२·८२ | ३६·७५ |
| १९५२–५३ | १८५·४८ | ४५३·७३ | ४०·८८ |
| १९५३–५४ | १९६·४६ | ४५७·१० | ४२·९८ |
| १९५४–५५ | १९५·१३ | ५२६·५६ | ३७·०६ |
| १९५५–५६ | २०५·४७ | ६७०.११ | ३०·६६ |
| १९५६–५७ (अंदाज) | २३०·२७ | ८५२.६६ | २७·०१ |

### चलनाचा पुरवठा
( आकडे कोटी रुपयांचे )

| वर्ष ( शेवटचा शुक्रवार ) | एकूण चलनी नोटा |
|---|---|
| १९३९ | ४९७-०७ |
| १९४३ | १४९०·१७ |
| १९४७ | २४८४·८३ |
| १९४८* | २१९०·७१ |
| १९४९ | २००३·७३ |
| १९५० | २०८५·०० |
| १९५१ | २०८०·५९ |
| १९५२ | १९३८·०५ |
| १९५३ | १८९०·६७ |
| १९५४ | १९३६·६३ |
| १९५५ | २०५४·७० |

### चार्टर्ड बँकेचा राणीकडे अर्ज

आशियांत व्यवसाय करणारी सर्वांत जुनी एक्सचेंज बँक, दि चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना, हिला पहिला चार्टर १८५३ मध्यें मिळाला व तो १९३९ मध्यें रिन्यु करण्यांत आला. चार्टरप्रमाणें, बँकेला केप ऑफ गुडहोपच्या पूर्वेकडील प्रदेशांतच व्यवहार करतां येतो. हा निर्बंध दूर करण्यांत यावा, असा बँकेनें एलिझाबेथ राणीकडे अर्ज पाठविला आहे. चीनमधील बँकेच्या शाखा बंद कराव्या लागल्यामुळें, ती आपलें कार्यक्षेत्र वाढवूं पहात आहे. बँकेच्या १९५५ च्या ताळेबंदाप्रमाणें तिनें सुमारें १२० कोटी रुपयांचीं कर्जें दिलेलीं असून तिला सुमारें १ कोटी रुपये नफा झाला आहे. डिव्हिडंडचा दर १५% कायम आहे.

### अमेरिकेंत व्यापारमंदीचीं पू[illegible]हें ?

१९५५ साल अमेरिकेंतील उद्योगधंद्यांना आतांपर्यंत सर्वांत भरभराटीचें गेलें. व्यापारधंद्यांनीं उलाढालींच्या बाबतींत नवा उच्चांकहि गांठला होता. परंतु आतां आगामी मंदीचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं आहेत किंवा काय, अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. अमेरिकेंतील कांहीं अर्थशास्त्रज्ञांनीं वर्ष संपण्याच्या सुमारास धंद्यांच्या उलाढालींत थोडीबहुत मंदी येणें अपरिहार्य आहे असें बजावलें होतें. पण त्यांच्यांतील निराशावादी असलेल्यांना सुद्धां सध्यां आलेल्या मंदीची कल्पना आलेली नव्हती. उद्योगधंद्यांबाबत न्यूयॉर्क टाइम्सनें प्रसिद्ध केलेल्या अहवालाप्रमाणें नवीन मोटारगाड्या आणि शेतीचीं अवजारें ह्यांच्या विक्रींत गेल्या वर्षीच्या मानानें १० ते ८० टक्क्यांची घट झालेली आहे. मोटारी आणि शेतीचीं अवजारें ह्यांच्या खपाचें प्रमाण अमेरिकेंत उद्योगधंद्यांच्या नाडीचें गमक धरलें जातें. कारण, त्यांच्या उत्पादनांत खूप मोठ्या प्रमाणावर औद्योगिक मालाचा वापर करण्यांत येत असतो. तेव्हां त्यांच्या विक्रीवर विपरीत परिणाम झाला तर त्याचे धक्के सर्वच अमेरिकन अर्थव्यवस्थेला जाणवतात. एकंदरीनें असें दिसतें कीं, गेल्या वर्षी अमेरिकन कारखानदारांनीं उत्पादन अधिक वाढविलें व त्याची विक्रीहि अधिक केली. त्यामुळें बाजारांत मालाचा वाजवीपेक्षा अधिक सुकाळ झाला. ह्यासंबंधी लिहितांना न्यूयॉर्क टाइम्स म्हणतो कीं ह्या परिस्थितीचे दूरगामी परिणाम चिंता उत्पन्न करणारे आहेत. उत्पादन कमी केलें जाण्याची आणि कामगारांना कामावरून काढून टाकण्यांत येण्याची शक्यता दिसत आहे. मोटारीच्या धंद्यांतील किरकोळीचे व्यापारी धंद्याच्या बाहेर फेकले जात आहेत. वसंत ऋतूच्या सुमारास नेहमींप्रमाणें धंद्यांना उर्जितावस्था प्राप्त होईल असें वाटलें होतें. पण तसें घडून आलेलें नाहीं. उलट, गेल्या दोन वर्षांत गेले नव्हते इतक्या खोल पातळिवर उद्योगधंद्यांना जावें लागलें आहे. कारखानदार घटत्या विक्रीला आणि उतरत्या नफ्याला सराऊ लागले आहेत.

### अशोक स्तंभ नसलेल्या नोटा सहा महिन्यांनीं रद्द होणार

अशोक स्तंभाचें चित्र नसलेल्या भारत सरकारच्या सर्व चलनी नोटा सहा महिन्यांनीं कायदेशीर चलन रहाणार नाहींत, असें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. रिझर्व्ह बँक आणि सरकारी ट्रेझऱ्या व त्यांचे एजंट येथें मात्र त्या स्वीकारल्या जातील. सरकारी ट्रेझऱ्यांत सर्व ट्रेझऱ्या आणि रिझर्व्ह बँकेचे एजंट म्हणून काम करणाऱ्या स्टेट बँकेच्या, हैद्राबाद स्टेट बँकेच्या व म्हैसूर बँकेच्या शाखा, ह्यांचा समावेश होतो. १९५० सालीं ह्या नोटा काढण्याचें थांबविण्यांत आलें आणि आतां व्यवहारांत अशा फारच थोड्या नोटा उरल्या आहेत.

तमाम दंतरोगांवर
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.